श्रीराम शिक्षण संस्था द्वारा संचालित

# श्रीराम कला महिला महाविद्यालय,

## धामणगाव रेल्वे (जि. अमरावती)



# अरुणोदय

## २०१८-१९

### पदवी आणि पदव्युत्तर

Website : www.shrirammmv.org, E-mail : Shrirammmv2000@gmail.com

## * मार्गदर्शक *

प्राचार्य डॉ. गणेश टाले

प्रा. योगेश काशीकर    प्रा. डॉ. मोनाली इंगळे

प्रा. राजेश आडे    प्रा. सुवर्णा घोपे

## * संपादक मंडळ *

कु. निकीता टोकसे
बी.ए. भाग-१ मराठी विभाग प्रतिनिधी

कु. निकीता तितरे
बी.ए. भाग-२ इंग्रजी विभाग प्रतिनिधी

कु. प्रांजली ढाणके
बी.ए. भाग-३ हिन्दी विभाग प्रतिनिधी

## * मुखपृष्ठ *

कु. नेहा सावंत
बी.ए. भाग-२


## * प्रकाशक *

प्राचार्य, श्रीराम कला महिला महा. धामणगाव रेल्वे

## * अक्षर जुळवणी *

जय काम्प्युटर्स

नगर परिषद जवळ, धामणगाव रेल्वे, मोबा. नं. ९४२२९१४३३०

## * मुद्रक *

श्याम प्रिंटर्स, रेल्वे गेटजवळ, धामणगाव रेल्वे

फोन नं. २३७३११ मोबा नं. ९८९०७३७१७८, ९४२३४२५४०४



ह्या वार्षिकांकातील विचार आणि मते प्रत्येक लेखकाची वैयक्तीक असून प्रकाशक आणि महाविद्यालय त्यांचेशी सहमत असेलच असे नाही.

# सं पा द की य

## "वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे..."

निसर्ग आणि मानव यांच्या मधे असलेल्या अभूतपूर्व नात, दोघांमध्ये असलेली परस्परांवलंबीता आणि अगाच्च शक्ती आपणास एक वेगळीच अनुभूती देवून जाते. अशाच आगळ्या वेगळ्या अनूभवांनी समृध्द असलेला आमच्या महाविद्यालयाचा सत्र २०१८-१९ चा "अरूणोदय" हा वॉर्षिकांक वाचकांच्या हाती देत असतांना मनस्वी खूप आनंद होत आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी हा प्रतिक असतो सृजनशिलतेचा, तारुण्याचाल नवचैतन्याचा, नवनिर्माणतेचा आणि भावूकतेचा. आपल्या जीवनात तो अनेक चांगल्या-वाईट, सुख-दु:ख गोष्टींचा अनुभव घेत असतो. नव्हे तो साठवणूक करीत असते ती योग्य त्या प्रगटीकरणाची, व्यासपीठाची आणि हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना मिळते ते वार्षीकांकाच्या माध्यमातून.



आजच्या आधुनिक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी हा स्पर्धेत मागे पडतांना दिसतो वास्तविक ग्रामीण विद्यार्थी कशातच कमी नाही. पण तो मागे राहतो ते आत्मविश्वास कमीमुळे, प्रगटीकरण न करता आल्यामुळे. महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थींच्या सुप्तगुणांना चालना मिळावी, आत्मविश्वास वाढावा व भावनांचे योग्य ते प्रगटीकरण करुन सृजनशील साहित्यीक व भावी नागरीक तयार व्हावा हाच अरुणोदय-संपादक मंडळाचा प्रयत्न आहे.

आमच्या विद्यार्थीनींनी अतिशय सुंदर लेख, कविता, चारोळ्या इ. साहित्य तिन्ही भाषेतून (हिंदी, इंग्रजी व मराठी) लिहले आहे. त्यांच्या साहित्यामधून त्यांच्या मधील वैचारिक परीपक्वतेची, प्रगल्भतेची जाणीव व परीचय होतो त्यांच्या विचारांशी संपादक मंडळ किंवा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही पण आमच्याकडे आलेला साहित्य पूर्ण पाहून आम्हाला मनस्वी खूप आनंद झाला. आमचे विद्यार्थी हे समाजाभिमूख आहे. त्यांनी सामाजीक, आर्थीक, भावनिक, कौटुंबीक मंत्राम्ना आपल्या शब्दात खूप समर्पकपणे मांडल्या आहेत. यावरुन



भावी जीवनात त्या उत्कृष्ट अशा लेखिका किंवा कवयित्री होवू शकतात यात तिळमात्रही शंका नाही.

'अरुणोदय' २०१८-१९ मध्ये विद्यार्थीनींच्या साहित्या सोबतच विविध विविध क्षेत्रात यश मिळवून महाविद्यालयाच्या किर्तीमधे मानाचा तुरा रोवणाऱ्या मानकरांच्या व विविध विभागांचा अहवालांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी आम्हाला अनेकांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये प्रामुख्याने मा.श्री. अरुणभाऊ अडसड, अध्यक्ष श्री.शि.स.धा.रे. व मा.श्री. घनश्यामजी मेश्राम, सचिव श्री.शि.स.धा.रे. तसेच विविध संचालक आणि मा.श्री. अशोकभाऊ पनपालिया, अध्यक्ष स्था.व्य.स.श्री.क.म.म.धा.रे. यांचे मार्गदर्शन मिळाले. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश टाले यांनी स्वत: पुढाकार घेवून नाविन्यपूर्ण बदल सूचविले आणि वेळोवेळी बहूमोल मार्गदर्शन केले. त्यामुळेच आम्ही 'अरुणोदय' चा हा वार्षिकांक प्रकाशीत करु शकलो. त्याचप्रमाणे संपादक मंडळातील सर्व सदस्यांनी वेळोवेळी अथक परिश्रम घेवून सहकार्य केले. तसेच सृजनशील मनाच्या विद्यार्थीनींच्या सहकार्याशिवाय हा अंक अस्थित्वात येणे शक्यच नव्हता. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व जय कॉम्प्युटर्स व श्याम प्रिंटर्स यांचे सहकार्य देखील तेवढेच मोलाचे आहे. त्यामूळे त्यांचे देखील मन:पूर्वक आभार.



आमचा हा वार्षिकांक विद्यार्थ्यांना ध्रुव ताऱ्यासारख्या मार्गदर्शक ठरुन त्यांना प्रेरणा देईल अशी आशा बाळगतो व तो आपणा समक्ष सादर करतो.

*धन्यवाद !*

– संपादक मंडळ

## श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
### अभ्यासकेंद्र
## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
### केंद्र क्र. १२१७५

**सुविधा/वैशिष्ट्ये :-**

- ✦ उच्च शिक्षित व प्रशिक्षित समंत्रक
- ✦ ऑनलाईन प्रवेश
- ✦ पूर्वतयारी प्रवेश प्रक्रिया
- ✦ बी.ए. मराठी माध्यम
- ✦ बी.ए. उर्दू माध्यम
- ✦ ICT चा उपयोग करुन संपर्क सत्र
- ✦ परिक्षा पूर्वी परिक्षेची पूर्व तयारी

**वर्ष २०१८-१९ प्रवेशीत विद्यार्थी संख्या :-**

| | |
|---|---|
| ✦ बी.ए. प्रथम वर्ष | - १५५ |
| ✦ बी.ए. द्वितीय वर्ष | - ५३ |
| ✦ बी.ए. तृतिय वर्ष | - ४८ |
| ✦ पूर्वतयारी | - १६ |
| ✦ बी.ए. प्रथम वर्ष उर्दू माध्यम | - ०८ |



प्राचार्य डॉ. गणेश टाले
केंद्रप्रमुख
९४०५८१७८७७



प्रा. राजेश आडे
केंद्रसंयोजक
९४२०५४७०८८



प्रफुल कांबळे
केंद्रसहायक
९८८१८५४१०१

**"ज्ञान गंगा घरोघरी"**



## ✲ आमचे प्रेरणास्थान ✲



**मा. श्री. अरुणभाऊ अडसड**

अध्यक्ष, श्रीराम शिक्षण संस्था, धामणगांव रेल्वे

मा. अरुणभाऊ अडसड यांची विधान परिषदेसाठी निर्विरोध निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन.

## * आमचे मार्गदर्शक *



**मा. श्री. घनश्यामजी मेश्राम**
सचिव, श्रीराम शिक्षण संस्था,
धामणगाव रेल्वे



**मा. श्री. अशोकभाऊ पनपालीया**
अध्यक्ष, स्था. व्य. स. श्रीराम कला
महिला महाविद्यालय, धा.रे.

# प्राचार्यांच्या लेखनीतून ...



आपल्या महाविद्यालयाचा सत्र २०१८-२०१९ या वार्षिकांक 'अरुणोदय' आपल्या हातात देतांना मनस्वी आनंद होत आहे. गेल्या १९ वर्षातील 'अरुणोदय' ची वाटचाल अतिशय उल्लेखनीय आहे. हे वर्ष माझ्यासाठी सुध्दा महत्वाचे आहे. माझ्याच महाविद्यालयात नियमीत प्राचार्य म्हणून माझी झालेली निवड ही माझ्यासाठी फारच गौरवाची बाबा आहे. महाविद्यालयाकडे सिंहावलोकन करुन बघताना असे वाटते की, गेल्या एकोणावीस वर्षात अनेक टप्पे पार करित बरीच उंची गाठलेली आहे. अनेक आव्हाने समोर आहेत. परंतु संस्थेचे अध्यक्ष आदरणीय अरुणभाऊ अडसड, सर्व पदाधिकारी यांनी टाकलेली जबाबदारी लीलया आपण पेलू शकू हा आत्मविश्वासही आहेच.

आपला देश आज अनेक स्थित्यंतरातून जात आहे. अनेक सामाजिक समस्यांनी समाजाची अवस्था दयनीय होत आहे. महिलांवर बलात्कार, खून होताना मन सुन्न होऊन जाते. रोजचे वर्तमानपत्र उघडले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्तेची बातमी कानावर पडते. या सर्व घडामोडींचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी हे सर्व आपापल्या परीने टिपण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे निश्चितच गौरवास्पद आहे. आणि 'अरुणोदय' महत्वाची भूमिका निभावत आला आहे. आजपर्यंतचा समाजाचा इतिहास पाहिल्यास असे दिसून येते की, समाजाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य केवळ तरुणाईतच असते. जगभरातील सर्व क्रांत्या घडवून आणण्यात तरुणाईने महत्वाची भूमिका बजावली आहे. ज्या देशाजवळ या तरुणाईचे सामर्थ्य असते त्या देशाची भरभराट होण्यास वेळ लागत नाही.

फक्त गरज असते ह्या शक्तीचा मोठा वापर करून घेण्याची. आपल्या देशामध्ये येणाऱ्या काळात संपूर्ण जगातील राष्ट्रांच्या तुलनेत तरुणांची संख्या जास्त असेल. अर्थातच कमावणाऱ्या लोकांची संख्या वाढून अवलंबीतांची संख्या कमी होईल. म्हणजेच देशाची महासत्तेकडे वाटचाल सुरु झालेली आहे. यावेळी तरुणांना, त्यांच्या शक्तीला, विचारांना चालना देण्याचा आम्ही 'अरुणोदय' ह्या माध्यमातून अल्पसा प्रयत्न करीत आहो. त्यांच्या पंखांना बळ देऊन अवकाशात मुक्त संचार करण्याकरीता प्रेरणा देण्याचे कार्य 'अरुणोदय' करीत आला आहे. यानंतर ही 'अरुणोदय' नवोदितांना प्रकाशमान करून त्यांची प्रतिभा वृध्दिंगत करण्याचा सातत्याने प्रयत्न करेल यात मुळीच शंका नाही.

आपल्या देशाचे माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांची कविता या निमित्ताने मला आठवते.

"बाधाएं आती है आएं
घिरे प्रलय की घोर घटाएं
पावों के नीचे अंगारे,
सिर पर बरसे यदि ज्वालाएं
निज हाथों में हंसते-हंसते,
आग लगाकर जलना होगा।
कदम मिलाकर चलना होगा।"

सर्वांनी सोबत राहून, एकमेकांना सोबत घेऊनच आपल्याला देशाची प्रगती करता येईल. एवढेच या निमित्ताने वाटते.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वेचे अध्यक्ष मा. अरुणभाऊ अडसड, सचिव मा. घनश्यामजी मेश्राम, स्था.व्य.स. अध्यक्ष, मा. अशोकभाऊ पनपालीया, मा. प्रतापदादा अडसड, संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचेही मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. संपादक मंडळ, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी आणि पालक यांचा वार्षिकांकाच्या निर्मितीत मोलाचा वाटा आहे. वार्षिकांकास माझ्या शुभेच्छा !

- प्राचार्य डॉ. गणेश क. टाले



*****



## ❊ यशाचे मानकरी ❊



**कु. समिक्षा बुटले**
(बी.ए. भाग-२)
स्व.ज.रा. उपाख्य भाऊसाहेब गणेरकर स्मृति आंतर महाविद्यालय जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा पारितोषिक विजेती



**कु. निकीता टोकसे**
(बी.ए. भाग-१)
राष्ट्रभाषा वकृत्व स्पर्धेमध्ये जिल्हा स्तरावर निवड



**कु. आरती चौधरी**
(बी.ए. भाग-३)
उत्कृष्ट रा.से.यो. स्वयंसेविका



**कु. नेहा सावंत**
(बी.ए. भाग-२)
सांस्कृतिक प्रतिनिधी







## ✲ यशाचे मानकरी ✲



**प्राचार्य डॉ. गणेश टाले**

४ थे मराठी विश्व साहित्य संमेलन, मलेशिया येथे निवड
संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील मराठी अभ्यास मंडळावर निवड
सर्वधारा मासिकाचे सहसंपादक म्हणून नियुक्ती
मराठी विषय पि.एडी. चे मार्गदर्शक म्हणून नियुक्ती
भटके व आदीवासी आत्मकथने या ग्रंथास स्व. सुर्यकांता देवी पोटे उत्कृष्ठ वाङ्मय निर्मीती राज्यस्तरीय पुरस्कार आणि स्व. रामभाऊ खारकर स्मृति राज्यस्तरीय पुरस्कार



**प्रा. मोनाली इंगळे**

गृहअर्थशास्त्र मधील मेळघाटातील महिलांच्या आहारविषयक सवयींच्या परिणामाचे अध्ययन या विषयात आचार्य पदवी प्राप्त





**प्रा. नंदकिशोर राऊत**

मराठी समाजशास्त्र परिषद मध्ये संगाबा अमरावती विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड



## ✲ संपादक मंडळ ✲



डॉ. गणेश टाले



प्रा. योगेश काशीकर



प्रा. मोनाली इंगळे



प्रा. राजेश आडे



प्रा. सुवर्णा घोपे



कु. प्रांजली ढाणके
हिंदी विभाग प्रतिनिधी



कु. निकीता तितरे
इंग्रजी विभाग प्रतिनिधी



कु. नेहा सावंत
मुखपृष्ठ



कु. निकीता टोकसे
मराठी विभाग प्रतिनिधी

## * महाविद्यालयीन कर्मचारी *



अनुक्रमे : प्राचार्य डॉ. गणेश टाले, प्रा. मोनाली इंगळे, प्रा. नंदकिशोर राऊत, प्रा. अभिजीत दोड, प्रा. नितीन विहाडे, प्रा. राजेश आडे, प्रा. सुधीर पाथरे, प्रा. योगेश काशिकर, डॉ. निता केणे, प्रा. सुवर्णा घोपे, प्रा. दादाराव उईके, अजय कुळकर्णी, राजेश भैय्या, राजेश मारवे, नागोराव पंचबुध्दे, संतोष शिसोदे, कल्पना चव्हान, शरद गवारले, प्रफुल कांबळे



# अंतरंग

## ■ मराठी विभाग ■

लेख / कविता इतर :



परिवर्तन विचारांचे / कॉलेजचे वर्ष / आयुष्य म्हणजे काय ? / शेतकरी / पावसातली पाखरं / माव / एक संधी जगण्याची / मला जन्माला येऊ द्या हो... / समुद्र / जपानी माणसाची कविता / सावित्रीबाई फुले / मैत्री / नोकरी / बदलत्या जगाचं चित्र / मिसकॉल / फॅशन्स / आयुष्य खुप सुंदर आहे / आई म्हणजे नेमकं कोण ? / प्रेम कुणावर करावे / न्यु फॅशन / आई / पाऊस / सुविचार / बाप / व्यथा बापाची / काम्प्युटर / सैनिक आणि नेता / बाप / विद्यार्थी नापास का होतात / साथ / मैत्री / चारोळी



## ■ हिंदी विभाग ■

लेख / कविता / इतर :



बेटी / जिंदगी / शायरी / एक बेटी की आवाज / सिन्धुताई सपकाळ /

## ■ English Section ■

ARTICAL, POETRY & OTHER :



Importance of Women / Importance of Education / Meaning of Success / Time is Money / The Importance of Water / Beauties of Nature / Words Denoting Phobia / Proverbs / Love

## ■ अहवाल विभाग ■

अहवालाचे नांव :



राष्ट्रीय सेवा योजना अहवाल -२०१८-१९ / ग्रंथालय अहवाल २०१८-१९ / शारीरिक शिक्षण व रंजन विभाग वार्षिक अहवाल २०१८-१९ / सांस्कृतिक अहवाल - २०१८-१९ / भौगोलिक सहल अहवाल २०१८-२०१९.

# मराठी विभाग



## परिवर्तन विचारांचे

राधा आठवित शिकणारी मुलगी. अत्यंत साधी, सरळ आणि सहकार्यवृत्तीची. अभ्यासात जेवढी हुशार तेवढीच खेळातही प्रवीण. जसी मैदना गाजवायची, तसी वर्गातल्या मुलांच्या अभ्यासातल्या अडचणी सोडवायला एका पायावर तयार असायची. त्यामुळे सगळ्यांना ती आपली वाटायची, अगदी शिक्षकांचीही ती आवडती विद्यार्थीनी होती.

शाळेत सहलीचे वारे वाहू लागले होते. तसी राधा हिरमुसली, कारण तिला माहीत होते, सहलीची फी आई भरु शकत नाही. घरातली ओढाताण तिला जाणवत होती. पण आईला कुठून तरी सहलीचे समजले. तिने राधाला सहलीची फी दिली. तिचा आनंद गगनात मावेना. ती पहिल्यांदाच सहलीला जात होती, त्यामुळे तिच्या डोक्यात सतत सहलीचा विचार डोकावत होता. कधी एकदाचा सहलीचा दिवस उजाडतो असे तिला झाले होते. सहलीचा दिवस निश्चित झाला. तिची सहल शनिवारी जाणार होती. हे ऐकूण राधाच्या कपाळावर आठ्या पसरल्या.

उद्या राधाची सहल जाणार होती. तिने आईला बजावून सांगितले, 'आई, मला सकाळी लवकर उठवं', नाहीतर मला उशीर होईल. रात्री तिला झोप येईना. कधी एकदाची सकाळ होते असे तिला झाले होते. सकाळ झाली राधा उठली. स्वत:चे पटपट आवरु लागली तेवढ्यात भिंतीवरची पाल चुकचुकली. राधाने पालीकडे पाहीले. तिला कसे तरीच झाले. स्वत:चे आवरुन आईने दिलेला डबा घेऊन ती निघाली. घरा बाहेर आली अन् तिला समोरुन मांजर आडवे गेले. परत एकदा तिचे मन खट्टू झाले. आपली सहल नीट पार पडेल का ? या विचारात राधा शाळेत पोहचली. बस आली होती. मुलांमधला उत्साह ओसंडून वाहत होता. सहलीच्या प्रवासाला सुरुवात झाली. पाच-सहा किलोमीटर प्रवास झाला अन् बसचा टायर पंक्चर झाला.

मुले नाराज झाली. सगळी मुले बसखाली उतरु लागली. राधाच्या मैत्रिणीचा पाय बसमधून उतरतांना मुरगळला. ती वेदनेने रडू लागली. राधा अस्वस्थ झाली. सकाळपासून हे काय होत आहे. असे तिला वाटू लागले. पाल चुकचुकणे, मांजर आडवे जाणे या गोष्टीला आई अपशकुन मानते. खरच असतील का हे शकुन-अपशकुन.

राधा बसखाली उतरली. तिने बसकडे पाहीले व जवळच्या एका खडकावर जाऊन बसली. पाय मुरगळलेल्या मैत्रीनीला एका सरांनी दवाखान्यात नेले होते. राधा उदास दिसत होती. तिच्या वर्गशिक्षकाचे लक्ष गेले. ते राधा जवळ आले. त्यांनी राधाच्या पाठीवर हात ठेवला. राधा दचकली. सर, राधाला म्हणाले. काय झाले राधा ? अशी का बसली. राधाने सरांना तिच्या मनात चाललेले विचार व अस्वस्थता सांगितली. शेवटी ती सरांना म्हणाली, 'सर' सकाळपासून हे असे अपशकुन, त्यात आज शनिवार. शनिवार म्हणजे ना कर्त्यांचा वार; वाईट वार. सर, आपली सहल नीट पार पडेल ना ? सर हसले व म्हणाले, चल बस सुरु झाली आहे.

तेवढ्यात डॉक्टरांकडे गेलेली राधाची मैत्रीण व शिक्षक आले. जातांना रडत गेलेली मैत्रीण, हसत आलेली पाहून राधाला बरे वाटले. डॉक्टरांनी तिच्या पायाचा मुरगळा काढला अन् तीला औषधही दिले होते.

दिवसभर मुलांनी सहलीत धमाल केली. मजा केली. कविता गायल्या, गाण्याच्या भेंड्या खेळल्या, खूप गप्पा

मारल्या, नाच केला, एकमेकांना कोडी घातली. विनोद सांगून व ऐकून पोट धरुन हसले. निसर्गाचे निरक्षण केले. निसर्गात फिरले, खूप गमती-जमती केल्या.

संध्याकाळी सहल परतली. सगळे एकमेकांना टाटा करुन घरी निघाले. सरांनी राधाला हाक मारली अन् म्हणाले, राधा, कशी झाली सहल ? कसा गेला आजचा दिवस ? राधा आनंदाने म्हणाली, सर, खूप मस्त, खूप मजा आली. धमाल केली सर सहलीत, आजचा दिवस खूप आनंदात गेला. सर खळखळून हसले. राधाच्या खांद्यावर हात ठेवत सर म्हणाले, राधा कोणताही वार हा वाईट नसतो. तू तर विज्ञानाचा अभ्यास करणारी विद्यार्थी आहेस अन् असल्या अशास्त्रीय गोष्टींवर विश्वास ठेवतेस ? राधाची चलबिचल झाली. ती कावराबावरा होऊन सरांकडे पाहु लागली. सर पुढे म्हणाले, अग विज्ञानाने किती प्रगती केली आहे. जग किती पुढे गेले आहे. रोज नवे नवे शोध लागत आहेत आणि आपण असल्या खुळचट, बिनबुडाच्या कल्पना धरुन बसायचे ? बाळा, आपण काही खात असू, तर आवाज होतोच ना ! स्वाभाविक नाही का हे ? आणि मांजर सजीव आहे म्हटल्यावर ते इकडून तिकडे फिरणारच. एका जागेवर बसुन तर राहू शकत नाही ना. तिच्या येण्या जाण्याने आपल्याला कसला अडथळा येऊ शकतो ? बसच्या टायरला काही अणुकूचीदार रुतले तर बस पंक्चर होते. हो की नाही ? अपशकुन वगैरे काही नसते. आणि बरं का बाळा, सगळे दिवस, वार चांगलेच असतात. मी तर म्हणेन, ज्या दिवशी आपण वाईट काम करु, दुसऱ्याला त्रास होईल असे वर्तन करु किंवा दुसऱ्याची मने दुखवू तो दिवस, तो वार वाईट म्हटला पाहीजे. समजले का ?

राधाच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आपण किती अशास्त्रीय विचार करतो हे तिला जाणवले. तिचे मन परिवर्तन झाले आणि स्वच्छ मनाने व विचाराने ती घरी निघाली.



कु. योगिता मानकर
(एम. ए., भाग १)

◆◆◆◆◆

## कॉलेजचे वर्ष

घरच्यांना वाटत मुल कॉलेजात जातात
अभ्यास करुन शिकुन लई मोठी होतात.
घरच्यांना काय माहीत
मुल इकडे काय करतात
टवाळक्या करतात की,
नुसत कॅन्टीनवर बसतात.



सर्व मुल तशी नसली
तरी बरीच असतात
घरच्यापेक्षा बाहेरच
जास्त मजा करतात.
घरीच घरी राहून बोर होतात.
म्हणून कॉलेजलाचं
आपलेसे करतात.

मग नवी मंडळी सुध्दा
सोबत भेटतात
त्यांच्या शौका बरोबर
स्वत:चे ही आयुष्य उध्वस्त करतात.

कु. मयुरी गभने
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆



## आयुष्य म्हणजे काय ?

आयुष्य म्हणजे खेळ नव्हे
फुकट मिळालेला वेळ नव्हे
आयुष्य एक कोडं आहे
सोडवाल तितकं थोडं आहे
म्हणून म्हणतोय आयुष्यात
येऊन माणसं मिळवावी
एक मेकांची सुख दु:खे
एक-मेकांना कळवावी.

बघायला गेलं तर
आयुष्यही खूप सोपं असतं
जगायला गेलं तर
दु:खातही सुखं असतं
चालायला गेलं तर
निखारेही फुले होतात
तोंड देता आले तर
संकट ही शुल्क असतं
वाटायला गेलं तर
ही समाधान असतं
पचवायला गेलं तर
अपयश ही सोपं असतं
हसायला गेलं तर
रडणेही सोपं असतं
बघायला गेलं तर
आयुष्यही खूप सोप असतं

आयुष्य म्हणजे पक्ष्यांचा खेळ
चांगली पानं मिळणं
आपल्या हातात नसतं
पण मिळालेल्या पानावर
चांगला डाव खेळणं
यावर आपलं यश
अवलंबून असतं

अधू नसते डोळ्यांमध्ये तर डोके इतके
सुंदर असले नसते.
दु:ख नसते ह्दयात तर
धडकत्या ह्रदयाला तर
किंमत उरली नसती
जर पूर्ण झाल्या असत्या
मनातील सर्व ईच्छा तर
भगवंताची काहीच गरज उरली नसती.

आयुष्य पण हे
एक रांगोळीच आहे
ती किती ठिपक्यांची
काढायची हे नियतीच्या
हातात असले तरी
तिच्यात कोणते व कसे रंग भरायचे
हे आपल्या हातात असते

आयुष्य खुप कमी आहे
ते आनंदानेच जगा
प्रेम मधूर आहे
त्याची चव चाखा
क्रोध घातक आहे.
त्याला गाडून टाका
संकटे ही क्षण भंगुर आहेत.
त्याचा सामना करा
आठवणी या चिरंतन आहेत
त्यांना ह्रदयात साठवून ठेवा.

कधी असेही जगून बघा
कधीतरी एखाद्यावर विनोद करण्याआधी
समोरच्याचा विचार करुन तर बघा
तर कधी कोणाच्या हास्यासाठी समाधानासाठी
न आवडलेल्या विनोदावरही हसून तर बघा
कधी असेही जगून बघा

पंख नाहीत मला पण
उडण्याची स्वप्न मात्र जरुन बघतो
कमी असलं आयुष्य
तरी भरभरुन जगतो
जोडली नाहीत जास्त नाती
पण आहेत ती मनापासून जपतो
आपल्या माणसांवर मात्र
मी स्वत:हा पेक्षा जास्त प्रेम करतो.



कु. अस्मिता पाटील
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

## शेतकरी

गाडी शिवाय
आपण जगू शकतो
तरी गाडी बनवणारा
करोडपती.....

दारु शिवाय
आपण जगू शकतो
तरी दारु बनवणारा
करोडपती.....

मोबाईल शिवाय
आपण जगू शकतो
तरी मोबाईल बनवणारा
करोडपती.....

कार शिवाय
आपण जगू शकतो
तरी कार बनवणारा
करोडपती.....

अन्ना शिवाय
आपण जगू शकत नाही
तरी अन्न, धान्य उगवणारा
शेतकरी अठरा विश्वे दारिद्री.....

एक विदारक सत्य
पेट्रोलचे भाव कमी झाले की संप
डिझेलचे भाव कमी झाले की संप
शिक्षक वर्गाचे पगार कमी झाले की संप
अरे, अरे, अरे, अरे
शेतकऱ्याने पिक न पिकवण्याचा संप केला तर
काय खाणार रे, काय खाणार रे ढेकलं, ढेकलं..



संकलक
- कु. अस्मिता पाटील
बी.ए., भाग - ३

◆◆◆◆◆

## पावसातली पाखरं

निर्भिडपणे वावरणारी
जणू या जगाची ठाकरं...
खिडकीत मला दिसलेली
ती पावसातली पाखरं...!

पावसात चिंब भिजवणारी
पंखाने ती धडपडणारी...
मधुर कल्लोळ करणारी,
ती पावसातली पाखरं...!

थोडीशी ती शहारलेली
खिडकीमध्ये बहरलेली...
आडोशाला बिथरलेली
ती पावसातली पाखरं...!

जाण्यासाठी आवरलेली
दाण्या-दाण्यासाठी सावरलेली...
पिल्लांस भेटण्या आतुरलेली
ती पावसातली पाखरं...!

अचानक पाऊस थांबला
मग यांची उडण्याची नखरं...
नुकतीच खिडकीत मी पाहिली,
ती पावसातली पाखरं...!



- कु. योगिता वानखडे
बी.ए., भाग - ३

◆◆◆◆◆



## माय

माझ्या डोळ्यातली आसवं
कुणी मायेनं पुसतांना
उरी हूंदका दाटतोया
गोष्ट मायेची सांगतांना

तिच्या फाटक्या लुगड्याला
किती ठिगळ जोडलेली
उभ्या आयुष्याला तिनं
कशी गाठण बांधलेली
मला कसस होतया
कुणी आई म्हणतांना
उरी हूंदका दाटतोया
गोष्ट मायेची सांगतांना

भरविला घास मुटका
माझ्या इवल्या मुकात
तिचा वरम कष्टाचा
पण सदा मी सुखात
तिनं बगितली सपन
पाला ऊसाचा काढतांना
उरी हूंदका दाटतोया
गोष्ट मायेची सांगतांना

सदा चालू वढाताण
न्हायी भुकंचं बी भाण
काया झिजवली परी
नाही लवली ती मान
माझ्या जिंदगिच तिनं
अस भविष्य लिहतांना
उरी हूंदका दाटतोया
गोष्ट मायेची सांगतांना

म्या लिवाया शिकले
मग सभेत बोलले
आज फुलात चालते
पण काटे का बोचले
तिच्या कष्टाचं चीज मी
असं रात्रदिन करतांना
ऊरी हूंदका दाटतोया
गोष्ट मायेची सांगतांना

उभा जलम घालवला
असा पेटत्या वणव्यात
पण भिजली मी कशी
तिच्या मायेच्या पावसात
तिला सबुद मी दिला
शेवटच्या वक्ताला
माझं जीवन घडविन
नाव तुझंच घेतांना



- कु. योगिता मानकर
एम.ए., भाग - १

◆◆◆◆◆

# एक संधी जगण्याची

वंशाचा दिवा हवा म्हणुन
का विझवता पणती वंशाची
का नाही देत तिला
एक संधी जगण्याची ॥धृ॥

दिवस सरला रात्र सरली
आता तरी सोडा जुने विचार
वंशाचा या तेजस्वी पणतीचा
करावा तुम्ही स्विकार ॥१॥

ती १० कल्पना ती १० सुनिता
अवकाश कपटाळले त्यांनी
झाशीच्या या रानरागिनीची
तलवार तळपती रणी ॥२॥

ज्योतिबा अन सावित्रीन
केला हो स्त्रीचा उध्दार
जिजामातेनं दिधला आपणास
शिवबा सम रणविर ॥३॥

तिच स्त्री तिच जननी
तिच आहे जीवनसखी
तिच सिता-द्रोपदी
नाही कोणी तिच्या सारखी ॥४॥




आहे ती स्वर्गातली देवता
मग का करता तिची हत्या
का नाही देत तिला
एक संधी जगण्याची ॥५॥

कु. मोनाली राऊत
(बी.ए., भाग -३)

◆◆◆◆◆

# मला जन्माला येऊ द्या हो...

मुलगी असण्याचा मी
काय गुन्हा केला ?
जन्माच्या आधीच
मारु नका हो मला !

आई – बाबा तुमच्या
मी तुकडा काळजाचा
माझ्या जन्म तुम्हाला
नाही वाटणार काळजीचा.

कधी तुमच्या जवळ
मी हट्ट करणार नाही
तुमचे नाव मोठे करण्याची
मी देते तुम्हाला ग्वाही.

लहानश्या घरात तुमच्या
मला थोडी जागा द्या हो
सुंदर जग पाहण्याकरीता
मला जन्माला येऊ द्या हो !

करेन तुमची आनंदाने
मी मरेपर्यंत सेवा
आई तुझ्या दुधाची शपथ
उजळ करीन वंशाचा दिवा !




कु. रविना भैसारे
(बी.ए., भाग -३)



# समुद्र

किनाराच तो मनाचा...
आवर घालणारा
विचार वारुला...
तापता कधी देह भानं
निळसर जळात डुबणारा
अथांग कधी उथळ...
भासातले आभास दावणारा,
दिलासा कधी...
थकल्या मनाला,
खुजेपणाची
जाणीव देणारा
नाजुक असा
उरात पाऊल ठसे
गोंदवून घेणारा
तरीही अलिप्त राहून
मोहात पाडणारा...
समुद्र
आणि
त्याचा किणारा...



कु. पुनम कठाणे
(बी. ए., भाग ३)

◆◆◆◆◆

# जपानी माणसाची कविता

अशक्य असे ते स्वप्न मला पहायचं आहे,
ज्याला कुणीही जिंकू शकत नाही,
अशा अजिंक्य शत्रुचा मला हरवायचं आहे
असह्य असे दुःख मला सहन करायचं आहे.
जेथे कुणीही धाडसी माणसे जाण्याच
धाडस करत नाही.
त्या ठिकाणी मला पोहचायच आहे.
ज्या वेळी माझे पाय थकले आहे.
पण समोर मला माझे यश दिसत आहे.
त्यावेळी मला माझे एक पाऊल
त्या दिशेने पुढे टाकायच आहे.
त्या यशाला मला गाठायच आहे,
वेळ कितीही बिकट असू दे
मला कुठेही थांबा घ्यायचा नाही.
''माझी नरकात राहण्याची तयारी आहे
पण त्याला कारण स्वर्गिय असले पाहिजे''



कु. प्रांजली ढाणके
(बी. ए., भाग ३)

◆◆◆◆◆

## सावित्रीबाई फुले

जी स्त्रीशक्ती उभारुन
अडचणी मागे सारुन
जगली लढली जिंकली
ती सावित्रीबाई...

कुणाशी वैर न मानता
शेणही अंगावर घेतले
पुस्तक पाटी सावरली
ती सावित्रीबाई...

किती तिची ख्याती सांगू
निशब्द माझे शब्द सदा
सर्वांची जी आदर्श ठरली
ती सावित्रीबाई...
सावित्रीबाई फुले यांच्या जयंती
निमित्त त्यांना आमचे नमन



- कु. समीक्षा बुटले
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

## मैत्री

मैत्री असावी एक शिल्पा
थोडी अती थोडी अल्प
मैत्री नसावी एक मुर्ती
डोळ्याचे अश्रृ स्वत: पुरती

मैत्री असावी जिवाभावाची
मदतीला संकट काळाची
मैत्री असावी एक दिवा
मागतीला उजेड हवा

मैत्री असावी एक त्याग
नकोय नुसता खोटा राग
मैत्री असावी एक मन
माझे उत्सव माझे सण

मैत्री असावी एक आरसा
महानतेचा नेत्री वसा
मैत्री असावी एक सागर
नकोच नुसती रिकामी घागर

मैत्री असावी एक जीवन
जरी थोडी तरी पावन



कु. प्रियंका बागडे
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆

## नोकरी

अनेक तरुणांप्रमाणे माझी ही नजर
तिच्या शोधात होती तिला प्राप्त
करण्यात अनेकांमध्ये शर्यत होती
कर्तृत्वाच्या बरोबर पैशाचीही जोड होती
ती अनेक तरुणांची भावी जीवन संगीनी होती
अशी ती सुखरु होती ती दुसरी तिसरी कोणी नसून फक्त एक नोकरी होती
फक्त एक नोकरी होती.



## बदलत्या जगाचं चित्र

हि कमजोर स्त्री
अशी तिची ही गोष्ट
तिच्या नशीबी होते
नेहमीच काबाडकष्ट

दिवसभर घरी राबराब राबून
राहावे लागत होते
पुरुषाच्या दबावाखाली दबून

पती मेल्यानंतर तिला
जावे लागत असे सती
जीवंतपणीच अग्नीत बसून
तोडावी लागत असे नाती

परंतू या स्त्रीला आता
समजू नका कमजोर
लोखंडालाही वाकवून
बनवू शकते ती दोर

आता सर्वच क्षेत्रात
स्त्री पुढे जाणार
पुरुषांपेक्षाही ती
पहिला नंबर घेणार

येणाऱ्या पुढील काही वर्षात
बदलणार आहे चित्र
कोणत्याही पुरुषांना
हूंगणार नाही कुत्र

आवडत्या कामाला होवू द्या घाई
पुरुष करेल घरकाम
नोकरी करेल बाई



◆◆◆◆◆

## मिसकॉल

खूप विचार केला पण
उत्तर काही सापडेना
तुझ्याकडून येणाऱ्या
मिसकॉलचं गुपीत काही उघडेना
कान तुझं असूनही
मिसकॉल मला मारतोस
माझा फोन जोवर येईना
मिस कॉलवर मिसकॉल मारतोस
म्हणूनच मला प्रश्न पडलाय ?
जर तु मिसकॉल करतोस
असंही मला समजत नाह्यासह
तु सर्वानाच मिसकॉल करतोस
कितीही आर्जव असल तरीही
पैशाची बचत करतोस
असही नाही की, तु खुप गरीब आहेस
आणि आर्थिकदृष्ट्या संकटात आहेस
म्हणूनच कधीतरी कॉलही करत जा
एवढे रुपये देवून मोबाईल घेतला
त्याचा पुरेपूर फायदा घेत जा
उत्साहापोटी मैत्रीसाठी मी ही
तुझ्या मिसकॉलला उत्तर देतो
माझ्याकडून तरी असं होणार नाही
जरूर एवढचं तुला सांगतो
तू समजदार आहेस यापुढे कॉल करशील
टॉकटाईम कडे न बघता, माणूसकीला बघशील.

कु. दामिनी नेवारे
(एम. ए., भाग १)

◆◆◆◆◆

## फॅशन्स

फॅशन्स समोर संस्कृती ही विसरुनच गेली. आजची पिढी, संस्कृती काय आहे ? याचे थोडेसेही विचार करत नाही. जेव्हा बघाल तेव्हा फॅशन, संस्कृती पेक्षा फॅशनला महत्व देवू. संस्कृतीचा नाश करत आहेत. असे दिसतात. उदा :- छोटे कपडे, कुंकू, टिकली ही तर कपाळाला दिसतच नाही. मुलींना फॅशन्स करण्यासाठी कुंकू, टिकली ओल्ड फॅशन्स समजतात. आणि टॅटू काढून फॅशन्स आहे असे मिरवतात. फॅशन्स करण्यासाठी आई-वडिलांना ब्लॅकमेल करुन त्यांना पैसे देण्यास त्रस्त करतात व त्यांनी केलेल्या कर्तव्यांना विसरुन जातात.

कोणत्याही वस्तूंची मागणी करायची असेल तर अडचणींचा विचार न करता आपल्या मागण्या पूर्ण करतात. संस्कार देणाऱ्या आई-वडिलांच्या चांगल्या चार समजूतीच्या गोष्टींना ते भाषण समजतात. मनात येईल तसे वागतात.

मुलांच्या सुखी जिवनासाठी आई-वडिल खुप कष्ट करतात. त्यांनी सुखसोयी पुरवतात. परंतू मुलांवर संस्कार देतांना खुप कष्ट करावे लागतात.

आपण समाजात जगतो. दहा लोकांचे दहा शब्द ऐकावे लागतात. म्हणून पालकांना मुलांच्या भविष्याची चिंता भेडसावत असते. मुले ज्या वस्तूंची मागणी करतात त्यांना ती देवून त्यांच्या मनासारखे वागतात. कारण मुलांना आई-वडीलांची जाणीव राहिली पाहिजे म्हणून परंतू उलट्या विचारांचे उलटे परिणाम घडतात.

संस्कृती, सदृढ विचार, संस्कार, परंपरा विसरुन फॅशन्स, स्टाईल, एन्जॉय याकडे या पिढीचा कल दिसून येतात.



- कु. शारदा इंगळकर
(बी. ए., भाग -१)

♦♦♦♦♦

## आयुष्य खुप सुंदर आहे

आयुष्य खुप सुंदर आहे
सोबत कुणी नसलं तरी
एकट्यानेच ते फुगवत रहा
वादळात सगळ वाहून गेले
वेगळं असं काही माझ्यात
खास नाही असं म्हणून
उदास होऊ नका.

मृगाकडे कस्तुरी आहे
फुलात गंध आहे
सागराकडे अथांगता आहे
माझ्याकडे काय आहे
अस म्हणून रडू नका
अंधाराला जाळणारा
एक सूर्य तुमच्यातही लपला आहे

आव्हान करा त्या सूर्याला
मग उगवेल तो तुमच्या आयुष्यात
नवीन क्षितिज घेऊन
अंधारमय रात्र संपवून
सोनेरी किरणांनी सजून
मग रोजच उगवेल एक
नवी सकाळ उत्साह ध्येयाने
म्हणून उदास होऊ नका.



कु. मयुरी गभने
(बी. ए., भाग १)

♦♦♦♦♦



## आई म्हणजे नेमकं कोण ?

आई म्हणजे नेमकं कोण ?
घरातच आहे देव मग देवळात आहे तरी कोण
काही जरी लागलं तर तोंडी आईचच नाव का येत
तिच्या पानावलेल्या डोळ्यामागचं गुपित नेमकं काय असतं
माय माझी लहानपणी मला तिच्या कुशीत झोपवायची...
कोणीही तिला काही खायला दिले तर ती ते घरी का आणायची
स्वत:साठी जगणं सोडून नेहमी दुसऱ्यासाठीच जगत राहते
स्त्री एवढी खंबीर कशी, स्वत: जळत राहून प्रकाश मात्र देतच राहते...
एवढं सार करुन तिला मिळतं तरी काय असेल
फक्त कौतुकाचे दोन शब्दांनी पोट तिचं भरत असेल
घरातली माणसं देखील मनाला टोचणारं तिला बोलतात
छोट्या-छोट्या चुकांवर का तिला ओरडतात.
आयुष्यभर आपल्याला सांभाळते जी आई
त्या आईचा काही लोकांना अर्थच कळत नाही...
अर्थच कळत नाही.



- कु. श्रध्दा निखार
(बी. ए., भाग - १)

♦♦♦♦♦

## प्रेम कुणावर करावे

प्रेम कुणावर करावे ?
जो आपल्याला आवडतो त्याच्यावर,
कि ज्याला आपण आवडतो त्याच्यावर ?
प्रेम कुणावर करावे ?
मन वेधून घेणाऱ्या गुलाबावर
की त्याला जपणाऱ्या काट्यावर
प्रेम कुणावर करावे ?
जन्म घेतलेल्या मायभूमीवर
की तिच्यासाठी प्राण अर्पण करणाऱ्या जवानांवर
प्रेम कुणावर करावे ?
सुंदर नाजुक वेलीवर
कि तिला आधार देणाऱ्या वृक्षांवर
प्रेम कुणावर करावे ?
रंगीबेरंगी दिसणाऱ्या फुलपाखरांवर,
कि तिला बागडण्याची चेतना देणाऱ्या वाऱ्यांवर
तुम्हीच सांगा
प्रेम कुणावर करावे ?
परवा भेटलेल्या मुलीवर
कि आयुष्यभर आपल्यावरुन जीव
ओवाळून टाकणाऱ्या
''आई-वडिलांवर''



- कु. श्रध्दा निखार
(बी. ए., भाग - १)

♦♦♦♦♦

## न्यु फॅशन

काय सांगु दादा, फॅशन ची कला
फॅशन पाहून मला अचंबा झाला
अहो झाकते तोंडावर रुमाल
तोंड झाकीच्या फॅशन, केली बाई
भलतीच कमाल ।।धृ।।

जवळून जाते पण ओळखल कोण
डोळे राहते फक्त उघडे दोन
तोंड राहते पूर्ण झाकून
कठीण झाल दादा ओळखणं
हे होय माय फॅशनची धमाल ।। १।।

पहिल्या काळात मोबाईल नव्हते
आता तर जो तो मोबाईल घेते
मोबाईल वरुन मिसकॉल देते
ठरलेल्या ठिकाणी दोघेही जाते
त्यांना तुम्ही काय हो म्हणाल ।।२।।

अमरावती जिल्हा शहरामध्ये
तोंड झाकीवर होती हो बंधी
पण अंगात ज्वालामुखीची धुंदी
फरार होते पाहून संधी
त्यांच सुख दुःख काय हो जाण्यालं ।।३।।

टि.व्ही. मागमाग सारा जग धावते
आपल्या आवडीच च्यायनलं लावते
जे नाही दाखवायच तेच त्यात दावते
टि.व्हीतल पाहून आपली काया उघडी ठेवते
पुढ पुढ काय तुम्ही पागल बनाल ।।४।।

- कु. जया डोंगरे
(बी. ए., भाग -२)

◆◆◆◆◆

## आई

गोड-गोड पुरण पोळीवर
तुप म्हणजे आई।
पृथ्वीवरती देवाचं
रुप म्हणजे आई।।

आई असते खमंग
थालीपीठावर लोणी।
तिच्यातूनच जन्मते
जीवनाची कहाणी ।।

मऊ मऊ भातावरचं
आई असते मेनकुट ।
सहन होत नसते
तिच्यापासून ताटातूट ।।

पांढऱ्या शुभ्ऱ्या भातावरचं
आई असते वरण
भुकेलेल जग सारं
तिला जात शरण ।।

आई करते तव्यावरची
गरमागरम पोळी ।
आपण बोललो तिखट
तरी ती लिमलेटची गोळी।।

आयुष्याच्या उन्हाळ्यातलं
आईस्क्रीम असते आई ।
गारवा देता देता
वितळत राहते आई ।।



- कु. शिल्पा चवरे
(बी. ए., भाग -१)

◆◆◆◆◆



## पाऊस

पाऊस कधी टिपटिप
तर कधी रिमझिम
पाऊस कधी अंकुर
पडत असतो

तर कधी मोती
बनवत असतो
पाऊस कधी दुःख
तर कधी सुख
बनवत असतो.

पाऊस कधी ढग
तर कधी वाळून
जात असतो.

पाऊस कधी मरणं
तर कधी जीवन
बनवत असतो.

### सुविचार

उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी
नजरेत सहा नवी दिशा असावी
घरट्याचे काय आहे. बांधता
येईल केव्हा ही क्षितीजाच्या
पलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी



कु. ज्योत्स्ना राऊत
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆

## बाप

सगळे लोक म्हणतात बाप कठोर असतो. मायेची बरोबरी बाप करत नसतो अरे... लोकांना बापाची बरोबरी तर माय करत असते, कारण माय मायाळू असते. एक-एक पैसा जमवून घर बांधतो बाप, बायको सोबत संसार करतो बाप, हे खरे आहे मुलांना जन्म देणारी माय, पण त्या मागेही बापाचाच हात असतो. मुलांना वेदना झाली की माय जोरजोराने रडायला सुरुवात करते. पण बाजुला जाऊन अश्रु ज्याच्या डोळ्यांतुन पडत असते तो बापच असतो. मुलांची तयारी करुन देणारी माय असते, पण शाळेत जाऊन आणणारा बापच. स्वत: मात्र चटणी-भाकर खाऊन राहत असतो पण मुलांच्या हौशी पुरविणारा बापच असतो. मुलीच्या लग्नासाठी लोकांकडून कर्ज काढुन लग्न करतो तो बापच असतो. माय मात्र नटुन थटून पाहुण्याचं स्वागत करते. अरे... माय माय म्हणता पण माय आनंदाच्या सोहळ्यात नक्कीच असते. पण दुःखाच्या सोहळ्यात मात्र बापालाच जावे लागते. म्हणूनच म्हणतो मित्रांनो.

माय ती माय असते आणि बाप तो बाप असतो...

## व्यथा बापाची

घाव लागी बाळाला
येते अश्रु डोळ्यात आईच्या...
समजून घेणा बाळा, व्यथा बापरुपी मायेच्या...
वेळं होती बाबाला ती, आई पाहे वाट रे...
तोच बाप शोधायला, घनघाट रे...
धरुनिया बोट ज्याचे, शिकला तु चालनं...
घालता येईना कपडे, तेही शिकला घालनं...
मारला मी तुला बाळा, येतो तुला राग रे...
तोही माझ्या प्रेमाचा, असतो मुळी भाग रे...
जग सुखी नको मला, हवा बाळ सुखी रे...
मोठा झाला विसरु नको, देण्या मुखी घास रे...

कु. उज्वला इरपाते
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆

## काम्प्युटर

खरचं किती हो खाता बघा भाव
अकबू आहात तुम्ही काम्प्युटर राव
हुशारकी किती मारत बसता
आलयं ना थोड की खो-खो हसता
स्क्रीनवर किती दाखवता ज्ञान
पाहणारा मग विसरतो भान
सीपीयु, मॉनिटर मेन हे युनीट
कि-बोर्ड शिवाय जमेना गणित
माऊस किती तुमचा खादाड
ऑपरेट करतो कसा धाडधाड
माहितीय खुला केलास भंडार
ज्ञानाचही तुम्ही उघडलय दार
किती आहे सुविधा बघा तुमच्याकडे
इंटरनेटचे आहे पसरले जाळे
मानवाला तुम्ही दिले वरदान
पण तारतम्याचे ठेवा म्हणे भानं
सगळेच फिके हे तुमच्यापुढे
तुम्हासाठी अडे सगळ्यांचे घोडे



- कु. प्रियंका बागडे
बी.ए., भाग - १

◆◆◆◆◆

## सैनिक आणि नेता

रायफल घेऊन मी उभा
देश रक्षणासाठी
तिरंगा घेऊन तू उभा
देश भक्षणासाठी
डोळ्यात अंजन घालून मी
सीमेवर देतो पहारा
डोळ्यात मुसळ घालून तू
दुश्मनाला देतो सहारा
रात्र रात्र जागून आम्ही
उग्रवाद्यांना करितो बंदी
दिवसा ढवळ्या तू मुर्खा
त्यास सोडवायची संधी शोधतो
त्यांचेसाठी मानव अधिकार
मज सैनिकांसाठी काय
नेत्यांचा मी बकरा झालो
हा आजचा समाचार हाय





- कु. प्रियंका बागडे
बी.ए., भाग - १

◆◆◆◆◆



## बाप

चांगल्या शाळेमध्ये टाकण्यासाठी धडपड करतो
डोनेशन साठी उधार आणतो
वेळ पडली तर हातपाया पडतो
तो बाप असतो...

कॉलेज मध्ये सोबत जातो होस्टेल शोधतो
स्वत: फाटकी बनियान घालून
तुम्हाला जिन्सची पॅन्ट घेऊन देतो
तो बाप असतो...

स्वत: टपरा मोबाईल वापरुन
तुम्हाला स्टायलिस मोबाईल घेऊन देतो
तुमच्या प्रिपेडचे पैसे स्वत: भरतो.
तो बाप असतो...

जातांना मुलगी सासरी धाय ओसळून रडतो
माझ्या मुलीला सुखी ठेवा
असे हात जोडून सांगतो
तो बाप असतो...



- कु. दामिनी नेवारे
(बी. ए., भाग -१)

◆◆◆◆◆

## विद्यार्थी नापास का होतात

वर्षाचे एकूण दिवस ३६५ असतात
६० दिवस उन्हाळ्याच्या सुट्टीत जातात
उरले ३०५ दिवस...
२५ दिवस दिवाळी व नाताळच्या सुट्ट्या
उरले २८० दिवस...
एका वर्षात एकूण ५२ रविवार असतात
उरले २२८ दिवस...
विद्यार्थी एका दिवसात ८ तास झोपतो
उरले १०८ दिवस...
आंघोळ, जेवण, कपडे बदलने, खेळणे, फिरणे
यामध्ये दररोज ४ तास जातत.
म्हणजे वर्षातून ८३ दिवस जातात.
उरले ३५ दिवस...
सणासाठी वर्षातून १५ दिवस सुट्टी असते
आता उरले २० दिवस...
१९ दिवस परीक्षा असते
उरला १ दिवस...
तो दिवस परीक्षेच्या निकालात जातो
मग आता तुम्हीच सांगा
विद्यार्थी नापास होणार नाही तर का ?



- कु. दामिनी नेवारे
(बी. ए., भाग -१)

◆◆◆◆◆

## साथ

नशिबाने साथ सोडली म्हणून मरायचे नसते
स्वप्नाच्या हिमतीने जगायचे असते.
मागचे सारे आठवून रडायचे नसते
भविष्याचा विचार करुन जगायचे असते
एक ठेच लागली म्हणून थांबायचे नसते
धैर्याने त्याच वाटेवरुन चालायचे असते
हसत खेळत नेहमी जगायचे असते
किती क्षणाच आयुष्य असतं
आज असत तर उद्या नसतं
म्हणूनच ते हसत हसत जगायच असतं

## मैत्री

तू जिथे जावे तिथे
तुझेच हास्य असावे.
जीवनात कधी तू
निराश न व्हावे.
कुठेही गेले तरी
आपली मैत्री हृदयात असावी.
जीवनात तुला सोबत सर्वांची असावी
भूतकाळ आठवला की
तुला आठवण सर्वांची यावी.
सोबत घालवलेले क्षण आठवून
डोळ्यात पाणी तुझ्या यावे.
असे सोबत घालवलेले क्षण
तू कधी न विसरावं.
तू इतकी समोर जावी की
गगणाला भरारी घालावी
आपण सगळ्या सोबत राहून
हिच आशा बाळगावी

- कु. मयुरी गभने
(बी. ए., भाग -१)

◆◆◆◆◆

## चारोळी

भेटीला गंध उरला नाही
मनाला सुगंध मिळाला नाही.
जगाला धर्म मिळाला नाही
आठवणी संपल्या नाही.
अश्रूंना कुणी समजले नाही
आभाळाचा आकार कुणी शोधला नाही.
पाण्याचा रंग बदलला नाही

शब्दातून दु:ख व्यक्त करता आले असते तर
अश्रूंची गरज भासलीच नसती,
सर्व काही शब्दाने सांगता आले असते तर
भावनांची किंमतच उरली नसती.

सूर्याचा उजेड पडते
चंद्राचा अंधार पडते
ताऱ्यांनी जग लुकलुकते
मुली दोन्ही घराचा सांभाळ करते
म्हणून मुलींना दिव्याची वात समजे



- कु. शारदा इंगळकर
(बी. ए., भाग -१)



# हिंदी विभाग

# English Section



## बेटी

बेटी बनलकर आयी हूँ।
माँ-बाप के जीवन मे।
बसेरा होगा कल मेरा।
किसी और के आंगण मे।
क्या ये रित खुदाने बनाई होगी।
कहते है आज नही तो कल
तु परायी होगी।
दे के जनम पाल पोसकर
जिन्होने हमे बडा किया।
और वक्त आने पर उन्ही
हातो ने हमे विदा किया।
टूट के बिखर जाती है।
हमारी जिंदगी वही पर
फिर उस बंधन मे।
प्यार होना जरुरी नही
क्या रिश्ता हमारा इतना
अजिब होता है।
क्या बस यही हम बेटीओं
का नसीब होता है।



- कु. प्रतिक्षा बोरकर
(बि. ए., भाग १)

*****

## जिंदगी

जिंदगी क्या है तेरा रुप
मानव के समझ के
परे है तेरा स्वरुप।
कभी तो लम्हों मे
बदल जाती है जिंदगी।
कभी सदियो तक युही
चलती रहती है जिंदगी।
कभी हवा के झोंको से बुझ जाता
लबा लब दीपक जीवन का।
कभी बाती के सहारे चलता
टिमटिमाता सा जीवन कितनों का।
जिंदगी तू कभी बनी किसी की
सहेली और कभी किसी के लिये
रही अनबुझ पहेली।

- कु. प्रियंका बागडे
(बि. ए., भाग १)

*****

किसीने हमसे पुछाँ।
इतने छोटे से दिल में।
इतने सारे दोस्त
कैसे समा जाते है ?
हमने कहाँ, वैसेही
जैसी छोटीसी हथेली में।
सारी जिंदगी की लकिरे
समा जाती है।

- कु. मयुरी गभने
(बि. ए., भाग १)

*****



## शायरी

दे सलामी इस तिरंगे को
जीससे तेरी शान है।
सर हमेशा ऊँचा रखना इसका
जब तक दील में जान है ..!

जमाने भर में मिलते है आशिक कई।
मगर वतन में खुबसुरत कोई सनम नही होता
नोटों में लिपटकर
सोने मे सिमटकर मरे है कई
मगर तिरंगे से खुबसुरत कोई कफन नही होता।

मै भारत बरस का
हरदम सम्मान करता हूँ।
यहाँ की चाँदनी मिट्टी
का ही गुणगान करता हूँ।
मुझे चिंता नही है स्वर्ग जाकर मोक्ष पाने की,
तिरंगा हो कफन मेरा बस यही अरमान रखता हूँ।

मेरे मुल्क की हिफाजत ही मेरा फर्ज है।
और मेरा मुल्क ही मेरी जान है।
इस पर कुर्बान है मेरा
सबकुछ नही इससे बढकर
मुझको अपनी जान है।

आजादी की कभी शाम नही होने देंगे।
शहीदों की कुर्बानी बदनाम नही होने देंगे।
बची हो जो एक बूंद भी लहू की
तब तक भारत माता का आँचल निलाम नही होने देंगे।

लिख रहा हूँ मैं अंजाम जिसका कल आगाज आयेगा।
मेरे लहू का हर एक कतरा इन्कलाब लायेगा।
मैं रहूँ या ना रहूँ पर ये वादा है तुमसे मेरा की,
मेरे बाद वतन पर मरने वालों का सैलाब आयेगा।

- कु. मयुरी काळे
(बी. ए. भाग - १)

*****

## एक बेटी की आवाज

माँ सुन ले मेरी ये बात
तेरे चरण छुन सके मेरे ये हाथ।
तेरी बेटी ही ना हूँ मैं मात
तेरी रक्षा करूंगी जब तक शरीर मे है जान।
मेरी सहन शक्ति को,
कोई ना समझे मेरी कमजोरी
मेरी कभी ना डरने की ख्वाहिश को कर दे तू पूरी।
जिन हाथों से मैं चल सीखाती
उन्ही हाथो से मैं बंदूक उठाती
जिस प्यार से मैं खाना बनाती
वैसे ही लगन से [illegible] उठाती।
भारत माँ तेरे लिए दे जान भी कुर्बान।
बस समाज से मेरी हर बेटी को मिले सम्मान।
तेरे लिए कुर्बान तन और मन
जोश से बोलते सबसे प्यारा हमारा वतन।

- कु. मयुरी काळे
(बी. ए. भाग - १)

*****

# सिन्धुताई सपकाळ

